# वसई - विरार शहर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग, मुख्यालय, विरार पूर्व

## सविस्तर निविदा सूचना

वसई विरार शहर महानगरपालिका खाली उल्लेख केल्याप्रमाणे विकास काम करणेसाठी शासनाचे पाणी पुरवठा विभागाकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदाराकडुन बी -१ नमुन्याम व्दिखोटा पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म **दि. २९/१२/२०१८ ते दि. ०४/०१/२०१९** पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवसाखेरीज महानगरपालिकेच्या कार्यालयीन कामकाजाचे वेळेत रोखीने विकत मिळतील. सदर कामांची इसारा रक्कम **आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका** या नावे देय असलेल्या डिमांड ड्राफ्ट द्वारे भरावी लागेल व सदर डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत जोडावा लागेल डिमांड ड्राफ्टद्वारे इसारा न भरलेल्या, खाडाखोड केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सशर्त निविदा नाकारण्यात येतील. सदर कामी पूर्णपणे भरलेल्या मोहोरबंद निविदा दि. ०८/०१/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यंत महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार यांचे कार्यालयात ठेवलेल्या सिलबंद निविदा पेटीत टाकण्यात याव्यात. प्राप्त निविदा या कार्यकारी अभियंता यांचे दालनात हजर निविदा धारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष निविदा समिती समोर शक्यतो त्याच दिवशी दुपारी ४.०० वा. प्रथम तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. १ उघडण्यात येईल. लिफाफा क्र १ मध्ये सविस्तर निविदा सुचनेमध्ये दर्शविल्यापंमाणे कागदपत्रे असल्यास वित्तीय बोलीचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल. याकामी आलेल्या निविदांपैकी कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | निविदा फॉर्म फी + १८% GST | कामाची मुदत | निविदा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पारोळ जलशुध्दीकरण केंद्र येथे क्लोरीन गॅस न्युट्रीलाईजेशनसाठी (Neutralisation) भुमीगत टाकी बांधणे. | रु. १,७२,१७१/- | रु. १,७२१/- | २% डी.डी.ने. व ३. बिलातून | रु. ५००/- + रु. ९०/- एकूण रु. ५९०/- | ३ महिने | बी - १ |

अटी शर्ती :-

१) कोरे निविदा फॉर्मची मागणी करते वेळी अर्जासोबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील (स्थापत्य) / सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

२) ज्या ठेकेदाराचे नावे कामाचे नोंदणी प्रमाणपत्रक आहे. त्यांनी मुळ कागदपत्रासह स्वत: अगर अधिकृत प्रतिनिधी मार्फत कोरे निविदा फॉर्म घेवून जाणे आवश्यक आहे.

३) नविदा बाबत अधिक माहितीसाठी पाणी पुरवठा विभागाशी संपर्क साधावा.

४) लिफाफा क्र. १ मध्ये खालील कागदपत्रांचा छायांकीत प्रती समावेश असणे आवश्यक आहे.

a. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील (स्थापत्य) /बांधकाम विभागाकडील (स्थापत्य) योग्य त्या वर्गातील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

b. GST नोंदणी प्रमाणपत्र

c. अशा प्रकारचा कामाचा अनुभवाचे प्रमाणपत्र

d. रु. १००/- स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र

e. तांत्रिक कर्मचारी यादी

सदरची कागदपत्रे लिफाफा क्र. १ मध्ये नसल्यास संबंधीत निविदा धारकास अपात्र ठरविण्यांत येईल व फक्त पात्र निविदाधारकांच्या स्पर्धात्मक निविदा बोलीचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.

५) अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कमी किंमतीचा देकार सादर करण्याऱ्या निविदा धारकांनी लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र. २ उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्या L-१ निविदाकाराने "Additional Performance Security Deposit" आठ दिवसाच्या आत संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडे डि.डि जमा करावा. ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथीलक्षम असणार नाही.

६) प्रथम न्यूनतम देकाराच्या (L-१) निविदाकाराने वरील विहित मुदतीत "Additional Performance Security Deposit" चा भरणा केला नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या (L-२) निदिदाकारास लेखी विचारणा करण्यात येईल व L-२ निविदाकार L-१ पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजूर करण्यात येईल.

७) अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कमी किंमतीचा देकार असल्यास इसारा रक्कमे बरोबर अतिरिक्त जमा करावा लागणारे परफॉमन्स सिक्युरीटी पुढील प्रमाणे.
देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी.ने सादर करणे अनिवार्य राहील. (उदा. १९% कमी दरासाठी पुढील प्रमाणे पृथ:करण :-
१०% कमी दरापर्यंत १% व १५% कमी दरापर्यंत (१५% - १०% = ५% ) तसेच ( १९% - १५ % ) = ४% करीता (४% x२% = ८%) असे एकूण ( १ % + ५ %+ ८% = १४%)

८) मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो त्याच दिवशी दु. ३ वाजून ०१ मी. अथवा दुसऱ्या दिवशी उपस्थित निविदाकार/ त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

९) कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा किंवा आलेल्या सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, वसई विरार शहर मनपा यांनी राखुन ठेवला आहे.

१०) इतर सविस्तर अटी-शर्ती निविदा फॉर्ममध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

जा.क्र.
दिनांक

कार्यकारी अभियंता
वसई विरार शहर महानगरपालिका